# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे -०४.

सर्व्हे नं. ८३२ अ, फायनल प्लॉट क्र. १७८/१७९, बी.एम.सी.सी.रोड,
बालचित्रवाणी शेजारी, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे -४११ ००४

फोन नं. ०२०-२५७०५००० फॅक्स नं.०२०-२५७०५१२२/२५६६५८०८


क्र.रा.मं./पापुई-७/५८२६,
दिनांक: २२नोव्हेंबर२०१९.
२५

प्रति,

विभागीय सचिव,
सर्व विभागीय मंडळे,

**विषय: इ.११ वी व १२ वी सुधरीत विषय योजना व मूल्यमापन योजना..**

संदर्भ:-१.शासन निर्णय क्र.संकीर्ण२०१९/प्र.क.२४३/१९)एसडी-४ मंत्रालय,मुंबई. दि.०८ ऑगस्ट,२०१९ चा शासन निर्णय..
२.या कार्यालयाचे परिपत्रकक्र.रा.मं/पापुअ/पापुई/संशोधन/इ.९वी व इ.१० वी विषय योजना व सुधारित मूल्यमापन/४२४१/दिनांक-१६ऑगस्ट२०१९
३. शासन शुध्दीपत्रक क्रमांक-अभ्यास-२११८/प्र.क्र.२४३/एसडी-४,मंत्रालय,मुंबई .दि.११ नोव्हेंबर २०१९..

उपरोक्त विषयास संदर्भीय शासन निर्णय क्र. १ अन्वये कळविण्यात येते की, सदर शासन निर्णया मधील १.Annexure-C मध्ये पर्यावरण शास्त्र व जलसुरक्षा या विषयात प्रश्नपत्रिका-३० गुण व वार्षिक कार्य २० गुण असे एकूण ५० गुण नमूद केले आहे. त्याऐवजी प्रकल्प-३० गुण व सेमिनार.जर्नल कार्य-२०,एकूण ५०गुण असे वाचावे.प्रकल्प कार्य व सेमिनार/जर्नल कार्य याबाबत मूल्यमापन योजना मंडळाने यापूर्वी जाहिर केल्याप्रमाणे राहिल,मात्र सदर विषयासाठी प्राप्त गुणांचे A,B,C,D श्रेणीत रुपांतर करण्यात येईल. D श्रेणी अनुत्तीर्ण दर्शवेल.

२.भौतिकशास्त्र,रसायनशास्त्र व जीवशास्त्र या विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षांच्या बाबतीत सहामाही व वार्षिक परीक्षा अशा दोन्ही परीक्षांचा उल्लेख आहे.वरील संदर्भीय शासन निर्णयनुसार सहामाही (सत्र-१ च्या)परीक्षेसाठी प्रात्यक्षिक परीक्षा असणार नाही. मात्र ३० गुणांच्या वार्षिक प्रात्यक्षिक परीक्षेबाबतच्या मूल्यमापन योजनेत बदल राहणार नाही.या तिन्ही विषयांसाठी बालभारतीने तयार केलेल्या प्रत्यक्षिक माहिती पुस्तिका वापरावी.जर्नल संदर्भात जर्नल निवडीचा निर्णय संबंधित उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांनी आपल्या स्तरावरुन घ्यावा.

३.वरील संदर्भीय शासन निर्णयातील **Annexure-B- अ.क्र.५६ मधील कलेचा इतिहास आणि रसग्रहण (History Of Arts Appreciation) (विषय क्र.६०)** व **अ.क्र.५७** मधील **संगीताचा इतिहास व विकास (History and development of indian music) (विषय क्र.६५ )** या विषयांच्या संदर्भात विषय निवडीबाबतच्या तरतूदी रद्द करण्यात येत आहेत. या दोन विषयांसाठी विषययोजना,मूल्यमापन योजना व अनुषंगिक सर्व तरतुदी प्रचलित पध्दती प्रमाणे सुरु राहतील.

४. **गृहविज्ञान(Home Science)** विषयांची सोय असलेल्या कनिष्ठ महाविद्यालय/उच्च माध्यमिक विद्यालयांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना गट **'क'मधील गृहविज्ञान** अंतर्गत देण्यात आलेल्या **वस्त्रशास्त्र,अन्नशास्त्र व तंत्रज्ञान,गृहव्यवस्थापन, बालविकास** या चार विषयांपैकी कोणतेही दोन विषय घेण्याचे स्वातंत्र्य राहील. उर्वरीत दोन विषय हे गट **'ब'** मधून घ्यावेत. याप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत आपल्या स्तरावर कळविण्यात यावे.

(डॉ.अशोक भोसले)
सचिव
राज्य मंडळ,पुणे-४

प्रति,

मुख्याध्यापक/प्राचार्य,
सर्व मान्यता प्राप्त कनिष्ठ महाविद्यालये, सातारा /सांगली/कोल्हापूर.

उपरोक्त परिपत्रकाप्रमाणे इ.११ वी व इ.१२ वी सुधारीत विषय योजना व मुल्यमापन योजना याबाबतची योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर